**<u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : २०/११/२००९

**<u>ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त</u>**
**<u>सभा क्रमांक १०, दिनांक २०/११/२००९</u>**
**<u>सभा सूचना क्रमांक ६, दि.१०/११/२००९</u>**
**<u>सभा क्रमांक १, दि.२०/११/२००९</u>**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २०/११/२००९ रोजी सभा सूचना क्रमांक ६, दिनांक १०/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात'' सकाळी ठिक ११.३० वा. आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर सौ.स्मिता सुभाष इंदुलकर हया उपस्थित होत्या.

**<u>सदर सभेस उपस्थित सदस्य खालील प्रमाणे.</u>**

१. सौ.स्मिता सुभाष इंदुलकर - महापौर
२. श्री.अशोक नारायण भोईर - उपमहापौर

| | |
|---|---|
| ३. श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक | ४. सौ.कविता सुरेश पाटील |
| ५. श्री.मधुकर रामचंद्र पावशे | ६. श्री.आनंदा तुकाराम केसरे |
| ७. सौ.मिनाक्षी राजेंद्र शिंदे | ८. श्री.रामचंद्र लहू फडतरे |
| ९. सौ.ताई मारुती भोंडवे | १०. श्री.राजेश नामदेव ठाकूर |
| ११. श्री. हणमंत ज्ञानू जगदाळे | १२. सौ.अनिता अशोक सावंत |
| १३. श्री.नागसेन गंगाराम इंदिसे | १४. सौ.वनिता गंगाराम इंदिसे |
| १५. श्री.बळीराम वासुदेव नईबागकर | १६. श्री.संजय देवराम भोईर |
| १७. श्री.देवराम लक्ष्मण भोईर | १८. श्री.रविंद्र माणिक पाटील |
| १९. सौ.महेश्वरी संजय तरे | २०. सौ.शारदा दादू पाटील |
| २१. श्री.राम हरि एगडे | २२. श्रीमती छाया मनोहर राव |
| २३. सौ.परिषा प्रताप सरनाईक | २४. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे |
| २५. श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | २६. सौ.केवलादेवी रामनयन यादव |
| २७. श्री.चंदू सुरेश कांबळे | २८. सौ.एकता एकनाथ भोईर |
| २९. श्री.पद्माकर संभाजी कांबळे | ३०. सौ.अपर्णा नंदकुमार यादव |
| ३१. श्री.दशरथ बाबुराव पालांडे | ३२. श्री.संतोष वसंत वडवले |
| ३३. कु.योगिता रमेश वैती | ३४. श्री.संजय प्रभाकर सोनार |
| ३५. श्री.अशोक राजाराम राऊळ | ३६. श्री.सुधीर विष्णू कोकाटे |
| ३७. श्री.संतोष गजानन साळवी | ३८. श्री.मुल्ला नजीब सुलेमान |
| ३९. श्रीमती मुल्ला फातिमा अंजुम मुहम्मद आसिफ | ४०. सौ.रुपाली रमेश कदम |
| ४१. श्री.मिलिंद माधव पाटणकर | ४२. श्री.मनोज विठ्ठल लासे |
| ४३. श्री.उमेश काशिनाथ पाटील | ४४. सौ.अनिता सुनिल गौरी |
| ४५. श्री.दिनेश दाजी कांबळे | ४६. सौ.अपर्णा मिलिंद साळवी |
| ४७. श्रीमती सुरेखा सुरेश खातू | ४८. सौ.प्रमिला मुकुंद केणी |
| ४९. सौ.शांता शामजी सोलंकी | ५०. श्री.बिष्ट महादिप उर्फ मुन |

५१. सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
५२. श्री.नारायण शंकर पवार
५३. श्री.विलास शिवराम सामंत
५४. श्री.संजय संतू वाघुले
५५. सौ.सुजाता भास्कर पाटील
५६. सौ.अनिता हिराकांत फर्डे
५७. श्री.अशोक बारकू वैती
५८. श्री.जनार्दन कृष्णा खेतले
५९. श्री.हरिष काशिनाथ वैती
६०. श्री.मधुकर विठ्ठल होडावडेकर
६१. श्री.राम पांडुरंग रेपाळे
६२. सौ.सुनिता (ताई) सुरेश सावंत
६३. श्री.शैलेश तुकाराम शिंदे
६४. सौ.प्रभावती माणिक पाटील
६५. डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ
६६. सौ.निता मदन कदम
६७. श्री.मनोज तुकाराम शिंदे
६८. सौ.संगिता चंद्रगुप्त घाग
६९. श्री.चंद्रगुप्त सिताराम घाग
७०. श्री.घनश्याम शिवाजी कणसे
७१. श्री.संजय भाऊराव मोरे
७२. श्री.रविंद्र सदानंद फाटक
७३. श्री.शैलेश तुकाराम सावंत
७४. सौ.संगिता मिलिंद बनकर
७५. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
७६. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
७७. श्री.लक्ष्मण (लच्छु) चंदुमल टिकमाणी
७८. श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत
७९. श्री.राजेश आत्माराम खारकर
८०. श्री.सुभाष आत्माराम खारकर
८१. सौ.मनिषा महेश साळवी
८२. श्री.राजेंद्र रमेश साप्ते
८३. सौ.अनिता बालाजी काकडे
८४. श्री.कुरेशी यासीन अयुब
८५. श्री.शिवदास नाना भगत
८६. श्री.रमाकांत दशरथ मढवी
८७. श्री.सुधीर रामचंद्र भगत
८८. श्रीमती नाईक हफीजा नसरुद्दीन
८९. श्रीमती शेख खान शगुफ्ता नसीर
९०. सौ.राऊत आशरीन ईब्राहिम
९१. श्री.सुभाष गणू भोईर
९२. श्री.दिलीप रतन म्हात्रे
९३. श्री.नरेश गणपत म्हस्के
९४. श्री.अनिल गजानन सावे
९५. श्री.पवन काशिनाथ कदम
९६. श्री.सनी वर्गीस थॉमस

**सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य खालील प्रमाणे.**

१. श्री.संजय रामचंद्र तांडेल
२. श्री.राजेश नामदेव सारंग
३. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर
४. श्री.दिनेश मनोहर पाथरे
५. सौ.द्रौपदाबाई जगदिश इंदिसे
६. श्री.सुधाकर वामन चव्हाण
७. सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील
८. श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील
९. श्रीमती राधा फत्तबहादूर सिंह
१०. श्री.राजन बाबुराव विचारे
११. सौ.स्मिता मधुकर देशमुख
१२. श्री.गणेश यशवंत साळवी
१३. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहेब
१४. श्री.राजन नारायण किणे
१५. सौ.अनिता राजन किणे
१६. सौ.स्वाती महेंद्र कोमुर्लेकर
१७. श्री.महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर
१८. श्री.अन्सारी असलम सलीम
१९. श्रीमती शेख रझिया इकबाल
२०. श्री.डोंगरे सिराज अहमद अली
२१. श्रीमी अन्सारी इम्तियाज बानु
२२. श्री.मिलिंद मनोहर साळवी

**सदर सभेस रजेवर असलेले सदस्य खालील प्रमाणे.**

१. श्री.मिलिंद भारत पाटील
२. श्री.सचिन जयराज म्हात्रे

( छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास मा.महापौर पुष्पहार अर्पण करतात.)

( तद्नंतर राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते.)

---------------------

मा.महापालिका सचिव :-

सभेची विषयपत्रिका वाचून दाखवितात व सभेस सुरुवात करतात.

महापौर महोदया, आजच्या सभेला नगर अभियंता श्री.के.डी. लाला हे काहीकामा निमित्त दिल्लीला गेल्यामुळे गैरहजर आहेत. तसेच खालील सन्मा.सदस्यांनी रजेचा अर्ज दिलेला आहे.

१) सन्मा.सदस्य श्री.मिलिंद भारत पाटील
२) सन्मा.सदस्य श्री.सचिन जयराज म्हात्रे

सन्मा.सदस्यांची रजा मंजूर करण्यात येते.......

तसेच करनिर्धानरक व संकलक श्री.हरिश्चंद्र मोरे व उपआयुक्त श्री.प्र.म. निंबर्गी हे कळव्याला अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी गेलेले आहेत त्यामुळे तेही आज सभेला उपस्थित राहू शकणार नाहीत.

श्री.सुभाष भोईर :-

महापौर महोदया, आपल्याकडे प्रथा आहे की, लक्षवेधी व प्रश्नोत्तरे झाल्यानंतर सभा तहकूबी किंवा दुखवटा ठराव घेतो अशी आपली प्रथा आहे. परंतु आज आपण कशा प्रकारे काम करणार आहात याची माहिती पहिल्यांदा सभागृहाला देण्यात यावी. प्रश्नोत्तरे आदि घ्यायची किंवा लक्षवेधी सूचना कधी घेणार आहात याचा खुलासा घेण्यात यावा नाहीतर सभा तहकूब झाली तर उद्या आमची लक्षवेधी सूचना घेण्यात येणार नाही असे सांगण्यात येईल. सभागृहात चर्चा होवून तसे इतिवृत्त झाले पाहिजे.

श्री.पांडुरंग पाटील :-

महापौर महोदया, ठाणे महानगरपालिका हद्दीत दि.१८/१०/२००९ रोजी मोठी दुर्घटना घडली यामध्ये ६ फायरमन मृत्युमुखी पडले. आज पहिली सभा आहे. तरी त्यांचे निधनाचा दुखवटा ठराव घेवून त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी आणि यानंतर जी मा.महासभा होणार आहे त्यामध्ये आपण प्रश्नोत्तरे व लक्षवेधी सूचना घेणार आहोत. आपली जी प्रथा आहे त्याप्रमाणे दि.२५/११/२००९ रोजीच्या सभेत लक्षवेधी व प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

श्री.देवराम भोईर :-

महापौर महोदया, माझी सभागृहाला विनंती आहे की, आज आपल्या समोर दुखवटा ठराव आले आहेत. परंतु जी दुर्घटना घडली त्याबाबतचा अहवाल आपण मागविला होता, त्याचा चौकशी अहवाल आताच आम्हाला प्राप्त झाला आहे. तरी माझी विनंती आहे की, सन्मा.सभागृह नेते व सन्मा.विरोधी पक्षनेते यांनी यावर बोलून श्रध्दांजली अर्पण करावी व पुढील मा.महासभेत या अहवालावर चर्चा घडवून आणावी.

श्री.हणमंत जगदाळे :-

महापौर महोदया, ठाणे शहरामध्ये मधल्या काळात दोन मोठया दुर्घटना घडल्या. आणि पहिली दुर्घटना घडली त्यामध्ये आपल्या अग्निशमन विभागाचे ६ जवान मृत्युमुखी पडले त्यामध्ये श्री.जी.सी. सिंग, श्री.ए.एस.ठाणेकर, श्री.के.जी. पाटील, श्री.एस.आर. जमादार, श्री.एस.के. शिंदे, श्री.टि.जी. काळे हे ६ जवान आहेत. वास्तविक पाहता याचबरोबर रेल्वे दुर्घटनेमध्येसुध्दा आपले तीन लोक मृत्युमुखी पडले आणि १६ लोक जखमी आहेत. यामध्ये सी.रामचंद्रन, सुभाष निकम आणि गोपाळ घाडी हे मृत्युमुखी पडलेल्यांची नांवे आहेत आणि जखमींमध्ये प्रदिप जोशी, रमेश वेळकर, विलास खरवट, दिपक भोये, हरिश्चंद्र शिंदे, विलास मोरे, अनिल पवार, प्रविण पेटकर, रमेश चोंडकर, कृपाल सिंग चितोडीया, केदार शिर्के, वनिता सिध्दु, अक्षय सिध्दु, कमल पिंगळे, सुधीर पिसाळ आणि शाहीर शिंदे अशी नांवे आहेत.

महापौर महोदया, अशा प्रकारच्या दोन दुर्घटना घडलेल्या आहेत. वास्तविक पाहता हया दोन दुर्घटना घडल्यानंतर आपले ६ जवान मृत्युमुखी पडले आहेत. आपण आणि मा.आयुक्त सो. यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. यामध्ये जे शहीद झाले त्यांच्या वारसांना आपण महापालिकेच्या सेवेत सामावून घेणार आहोत. तशा प्रकारची आपण आश्वासने दिलेली आहेत. त्याची पुर्तता देखील निश्चित प्रकारे झाली पाहिजे. परंतु हा सर्व प्रकार आहे, ज्यावेळी हा प्रकार घडला, जे शहीद झाले त्यांना आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत, आणि जो प्रकार घडला त्याची विस्तृत अशी चर्चा होणे आवश्यक आहे. आणि या सभागृहात चर्चा होत असतांना यामध्ये कोण दोषी आहेत, याला जबाबदार कोण आहेत, दोन्ही दुर्घटना घडल्यानंतर आरोप आणि प्रत्यारोपाचे फैरी झडल्या गेल्या, निश्चित जबाबदारी कोणाची आहे अशा प्रकारचा संभ्रम या शहरात नागरिकांमध्ये निर्माण झाला होता. या सर्व बाबींचा विचार केला तर या संदर्भात या सभागृहात विस्तृत चर्चा होणे आवश्यक आहे आणि तशा प्रकारची चर्चा आपल्याला सभागृहात ऐकायला मिळत आहे. मा.स्थायी समितीच्या सभेत अशा प्रकारची चर्चा झाली आहे, तरी माझी विनंती आहे की, अशा प्रकारचा अहवाल सभागृहाला सादर झाल्यानंतर आपण या सभागृहामध्ये चर्चा करावी आणि या दोन्ही दुर्घटनामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली म्हणून आजची ही सभा पूर्णवेळ तहकूब करावी, अशा प्रकारची मी आपल्याला सूचना करीत आहे.

श्री.पांडुरंग पाटील :-

महापौर महोदया, सन्मा.विरोधी पक्षनेते श्री.हणमंत जगदाळे साहेब यांनी जी सूचना मांडली की, ठाणे शहरात मागच्या काळात दोन दुर्घटना घडल्या त्यामध्ये तारांगण येथे झालेल्या दुर्घटनेत आपले सहा जवान मृत्युमुखी पडलेत. त्यानंतर रेल्वेची दुर्घटना झाली यामध्ये मोटरमन आणि दोन प्रवासी नागरिक मृत्युमुखी पडलेत. दोन्ही घटना दिवाळीच्या पूर्वाधात आणि उत्तरार्धात झालेल्या आहेत त्यामुळे ठाणे शहरावर दिवाळीच्या दरम्याने दुःखाचे सावट पसरलेले आहेत. जे घडायला नको ते घडलेले आहे. त्या दरम्यानच्या काळात वृत्तमानपत्रात आणि दूरचित्रवाहिनींवर दुर्घटनेसंदर्भात आणि महापालिकेच्या संदर्भात आणि एकूण यंत्रणेबाबत निरनिराळे संदेह व्यक्त केलेत. याबाबत मा.स्थायी समितीमध्ये चर्चा झाली असतांना नगर अभियंता श्री.के.डी. लाला यांची नियुक्ती करुन सदरचा अहवाल तयार करणेबाबत आदेश पारित केले आहेत. त्यांना त्वरित सूचना पारित केलेल्या होत्या, त्यानुसार अहवाल प्राप्त झाला आहे.

महापौर महोदया, परंतु ५ मिनिटांपूर्वीच हा अहवाल आल्याने विस्तृतपणे आपण चर्चा करु शकत नाही. याचे वाचन करुन पुढील सभेत यावर करता येईल. हे करीत असतांना खरी स्थिती ठाणेकर नागरिकांना कळणे आवश्यक आहे. एका दृष्टीने महापालिका आणि फायरमन आरोपीच्या पिंज-यात उभे आहेत. हा दोषी की, तो दोषी यामध्ये न जाता त्यांच्या कुटूंबांना दिलासा कसा देता येईल. घटना घडून गेलेली आहे. मी या ठिकाणी मा.महापौर व मा.आयुक्त महोदय यांचे निश्चित कौतुक करतो की, दुर्घटनेनंतर त्यांच्या कुटूंबियांवर जी परिस्थिती ओढवलेली आहे त्यांच्या वारसांना महापालिकेच्या सेवेत घेतल्याबाबतचे नियुक्त पत्र महापौर दालनात देत आहोत. परंतु हे नियुक्ती पत्र देत असतांना अनुकंपा तत्वाच्या ज्या केसेस आहेत त्यांच्या नातेवाईकांना ताबडतोब कामावर घेण्यात यावे असा निर्णय मा.महासभेने घेतलेला आहे. काही काळासाठी ठोक पगारावर घेण्यात यावे नंतर त्यांना कायम सेवेत घेण्यात यावे असा निर्णय आहे परंतु काही लोकांच्या बाबत हा आदेश पाळण्यात आलेला नाही.

महापौर महापौर, जे अधिकारी/कर्मचारी मृत्युमुखी पडलेत त्यांच्या नातेवाईकांना दिलासा द्यायचा असेल तर येणा-या मा.महासभेपूर्वी त्यांना नियुक्ती पत्र देणेबाबत त्वरित कार्यवाही करावी. तसे आदेश निर्गमित करावेत. या ६ जवान आणि रेल्वे दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले ३ जण, तसेच जलतरण पटू श्री.शैलेश यांचे दुःखद निधन झाले आहे,, ॲथलेटिक्स खेळाडू श्री.प्रल्हाद भांगले यांचे दुःखद निधन झाले आहे, सन्मा.पद्माकर कांबळे यांचे वडील श्री.संभाजी कांबळे यांचे दुःखद निधन झाले आहे, सन्मा.सदस्या राधा सिंह यांचे पती श्री.फत्तेबहादूर सिंह यांचे दुःखद निधन झाले आहे. सन्मा.सदस्य श्री.राम एगडे यांचा मुलगा श्री.किरण एगडे यांचे दुःखद निधन झाले आहे. तसेच माजी सन्मा.सदस्य श्री.मोहन तिवारी यांचे वडिलांचे आजच दुःखद निधन झाले आहे व सन्मा.सदस्य श्री.महेंद्र कोमुर्लेकर यांच्य मातोश्रींचे आज दुःखद निधन झाले आहे या सर्वांना ही मा.महासभा श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच सन्मा.सभागृह नेते यांनी ही सभा पूर्णवेळ तहकूब करण्याची सूचना मांडली आहे त्याला मी अनुमोदन देत आहे.

( सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.)

मा.महापौर महोदया :-

पुढील सभा बुधवार दि.२५/११/२००९ रोजी घेण्यात येईल.

--------------------

# दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११२, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात फायरमन या पदावर कार्यरत असलेले श्री.ए.एस.ठाणेकर, श्री.के.जी. पाटील, श्री.एस.आर. जमादार, श्री.एस.के. शिंदे, श्री.टि.जी. काळे व श्री.गिरीपिन सिंह यांना वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत येत असलेल्या तारांगण सोसायटीतील येथील पुनर्वसु इमारतीमध्ये लागलेली आग विझवितांना विर मरण आले आहे.

शनिवार दि.१७/१०/२००९ रोजी रात्री तारांगण सोसायटीजवळील पुनर्वसु इमारतीला लागलेली आग विझविझ्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे पथक आग विझविण्यासाठी गेले होते. सदरहू इमारतीतील आग विझवून सदर इमारतीच्या लिफ्टमधून खाली येत असतांना अचानक लिफ्ट बंद पडल्याने यामध्ये गुदमरुन या फायरमनचा मृत्यु झाला. त्यामुळे महापालिका अग्निशमन विभागातील सहा फायरमनला आपण मुकलो आहोत. सदैव आपल्या सेवेत तत्पर असलेले फायरमन यांना विरमरण प्राप्त झाले आहे त्यामुळे संपूर्ण ठाणे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै.ए.एस.ठाणेकर, कै.के.जी. पाटील, कै.श्री.एस.आर. जमादार, कै.एस.के. शिंदे, कै.टि.जी. काळे व कै.गिरीपिन सिंह यांच्या अपघाती निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११३, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले व ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना आणि ठाणे मॅरेथॉन ट्रस्टचे सचिव श्री.प्रल्हाद महाबळेश्वर भांगले यांचे गुरुवार दि.२९ ऑक्टोबर २००९ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ५० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व १ मुलगी असा परिवार आहे.

प्रल्हाद महाबळेश्वर भांगले हे ॲथलेटिकशी लहानपणापासून निगडीत होते. खेळाडू म्हणून त्यांनी लांब पल्ल्याच्या ५००० मीटर्स शर्यतीत देशात आपला ठसा उमटविला होता. मुंबई विद्यापिठाच्या ५००० मीटर्स शर्यतीत त्यांनी नोंदविलेला विद्यापीठ विक्रम कित्येक वर्ष अबाधित होता. खेळाडू म्हणून निवृत्त झाल्यावर त्यांनी संघटनेच्या प्रशासकीय कामात स्वतःला वाहून घेतले होते. जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या सचिव पदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अनेक उत्कृष्ट होतकरु आणि गुणी धावपटूंना नेहमीचा मतदतीचा हात दिला. खेळाडूंना भेडसावणा-या समस्यांविषयी ते फार जागरुक होते आणि प्रसंगी पदरचे पैसे खर्च करत त्यांनी खेळाडूंना मदतही केली होती. त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटना, ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना व ठाणे मॅरेथॉन ट्रस्ट यांनी एक कुशल प्रशासक गमावला आहे.

कै.प्रल्हाद महाबळेश्वर भांगले यांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.प्रल्हाद महाबळेश्वर भांगले यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११४, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले श्री.शैलेश मधुकर किलजे यांचे सोमवार दि.३१/०८/२००९ रोजी त्यांचे गावी आकस्मिक निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ५० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व २ मुली असा परिवार आहे.

श्री.शैलेश मधुकर किलजे यांनी ठाण्याचा पहिला इंग्लिश खाडी पोहणारे राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील जलतरणपटू ठरले आहेत. श्री.शैलेश किलजे हे ठाणे महानगरपालिकेत जलनिर्देशक या पदावर कार्यरत होते.

कै.शैलेश मधुकर किलजे यांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.शैलेश मधुकर किलजे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## <u>दुखवटा ठराव</u>

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११५, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री.राम हरि एगडे यांचा मुलगा श्री.किरण राम एगडे यांचे दिर्घ काळाच्या आजाराने दुःखद निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ३२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा व आई-वडिल, भाऊ असा परिवार आहे.

श्री.किरण राम एगडे हे गेल्या कांही दिवसांपासून कर्करोगाने आजारी होते. लहानपणापासूनच समाजसेवेची आवड असलेले श्री.किरण एगडे हे विभागातील गोरगरीब नागरिकांच्या मदतीला धावून जात असत. निःस्वार्थीपणे सेवा करणारा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती म्हणून अल्पावधीतच ते लोकप्रिय झाले होते. श्री.किरण एगडे यांच्या निधनामुळे विभागात हळहळ व्यक्त होत आहे.

कै.किरण राम एगडे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.किरण राम एगडे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११६, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह यांचे पती श्री.फत्तेबहादूर सिंह यांचे बुधवार दि.०७/१०/२००९ रोजी ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ५५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, असा परिवार आहे.

श्री.फत्तेबहादूर सिंह हे वागळे इस्टेट विभागातील इंदिरानगर या विभागात समाजसेवेचे कार्य करीत होते. समाजातील गरीब नागरिकांच्या मदतीला ते नेहमी धावून जात. एक निःस्वार्थी समाजसेवक म्हणून त्यांची ओळख होती. कै.फत्तेबहादूर सिंह यांच्या आकस्मिक निधनामुळे विभागात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कै.फत्तेबहादूर सिंह यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.फत्तेबहादूर सिंह यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## <u>दुखवटा ठराव</u>

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११७, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री.पद्माकर संभाजी कांबळे यांचे वडिल श्री.संभाजी मारुती कांबळे यांचे बुधवार दि.०९/०९/२००९ रोजी सायंकाळी ६.०० वा. त्यांचे मूळ गावी म्हणजे खिल्लारी, जि.लातूर येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ मुले, मुली, स्नूषा, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

श्री.संभाजी मारुती कांबळे हे वागळे इस्टेट विभागातील अंबिकानगर या विभागात समाजसेवेचे कार्य करीत होते. समाजातील गरीब नागरिकांच्या मदतीला ते नेहमी धावून जात. एक निःस्वार्थी समाजसेवक म्हणून त्यांची ओळख होती. कै.संभाजी मारुती कांबळे यांच्या आकस्मिक निधनामुळे विभागात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कै.संभाजी मारुती कांबळे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.संभाजी मारुती कांबळे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## <u>दुखवटा ठराव</u>

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११८, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री.महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर यांची आई श्रीमती कल्पना वसंतराव कोमुर्लेकर यांचे शुक्रवार दि.२०/११/२००९ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ५५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, स्नूषा, नातवंडे असा परिवार आहे.

श्री.महेंद्र कोमुर्लेकर यांच्या लहानपणीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते, त्यांच्या पश्चात त्यांच्या आईने संपूर्ण कुटूंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी सांभाळून मुलांचे शिक्षण पूर्ण करणे, त्यांचे सामाजिक जीवन घडविणे यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केलेत. अतिशय बिकट परिस्थितीशी सामना करुन त्यांनी आपल्या कुटूंबाचा सांभाळ केला, समाजामध्ये त्यांचे सलोख्याचे संबंध होते त्यामुळे त्यांची मायाळू आई अशी विभागात ओळख होती. त्यांच्या आकस्मिक निधनाने विभागात हळहळ व्यक्त होत आहे.

कै.श्रीमती कल्पना वसंतराव कोमुर्लेकर यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.श्रीमती कल्पना वसंतराव कोमुर्लेकर यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# <u>दुखवटा ठराव</u>

ठाणे महानगरपालिका ठराव क्र.११९, दिनांक २०/११/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री.मोहन पारसनाथ गोस्वामी (तिवारी) यांचे वडिल श्री.पारसनाथ महावीर गोस्वामी (तिवारी) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यु समयी त्यांचे वय ९० वर्षे होते. त्यांच्या पश्चात ७ मुले, ४ मुली, स्नूषा, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे.

नौपाडा विभागातील दमानी इस्टेट विभागात समाजसेवेचे कार्य करीत होते. समाजातील गरीब नागरिकांच्या मदतीला ते नेहमी धावून जात. एक निःस्वार्थी समाजसेवक म्हणून त्यांची ओळख होती. कै.पारसनाथ महावीर गोस्वामी (तिवारी) यांच्या आकस्मिक निधनामुळे विभागात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कै.पारसनाथ महावीर गोस्वामी (तिवारी) यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.पारसनाथ महावीर गोस्वामी (तिवारी) यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावूपर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

( तद्नंतर दुपारी १२.१५ वा. मा.महापौर महोदया सभा तहकूब झाल्याचे जाहिर करतात.)

सही/- सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा तहकूब झाल्याची वेळ : दुपारी १२.१५ वा.
दिनांक : २०/१२/२००९
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

सही/-
**( सौ.छाया मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.